**CNR No :- MHSI100001902021**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. १९/२०२१ :–

## –: निशाणी ४२ वरील आदेश :–

प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुद्ध पारीत झालेला निशाणी ४० वर ''म्हणणे नाही'' चा आदेश रद्दबातल होण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ चे म्हणणेनुसार, प्रतिवादी क्र. १ हे आपल्या कामाधंद्यानिमित्त मुंबई येथे असल्याने त्यांना नि.क्र. ४० वर म्हणणे देता आले नाही. प्रतिवादी हे वयोवृद्ध आहेत. सदर अर्जावर प्रतिवादी तर्फे म्हणणे देणे अतिशय गरजेचे आहे. सबब, प्रतिवादी विरुद्ध पारीत झालेला ''म्हणणे नाही''चा आदेश रद्दबातल करण्याची विनंती प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी केली.

०३. प्रस्तुत अर्जाचे कामी वादीतर्फे म्हणणे मागविण्यात आले. वादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन अर्ज मंजूर करण्यास तीव्र विरोध केला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार सदरचा अर्ज हा धादांत खोटा व खोडसाळ असुन त्यामधील मजकुर चुकीचा व दिशाभुल करणारा असल्याने सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे नि.क्र. ४० वर म्हणणे विहीत मुदतीत सादर न केल्याने त्यांच्या विरुद्ध नि.क्र. ४० ''विना म्हणणे'' चालविणेचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादींनी अर्जात नमुद केलेले विलंबाचे कारण संयुक्तीक व समाधानकारक नाही. न्यायालयाचा व

परीणामी वादीचा अमुल्य वेळ प्रतिवादींच्या या कृत्यामुळे वाया गेलेला आहे. परंतु केवळ विलंब झाला म्हणुन प्रतिवादींचे म्हणणे न स्वीकारणे हे नैसर्गीक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर झाल्यास, प्रतिवादींना अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाहीची पुनरावृत्ती करावी लागणारी आहे. तसेच प्रतिवादी यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल झाल्यास निशाणी ४० कडील अर्ज गुणदोषावर निकाल करणेस न्यायालयास मदतच होणार आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम १५१ अंतर्गत न्यायालयास असलेल्या अधिकाराचा वापर करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचीत राहील. प्रतिवादींनी केलेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करता येणारे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु.२००/–(रुपये दोनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन नि.क्र. ४२ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जाकामी झालेली खर्चाची रक्कम वादीस आदा केल्यानंतर प्रतिवादीं विरुद्ध निशाणी क्र. ४० वर पारीत झालेला ''म्हणणे नाही'' चा आदेश रद्दबातल करण्यात येत आहे.

३. प्रतिवादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत आदेशाची पुर्तता न केल्यास, सदरचा आदेश स्वयंचलनाने रद्द झाला असे समजण्यात यावे.

सही/–***

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – २५.०१.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.